


दैनिक

# धर्मयोध्दा

मातीशी इमान राखणारे...
सत्यासाठी लढणारे...

संपादक :- रामेश्वर गणपतराव शिंदे मो. नं.९४२१४७९८८१ MAHMAR/2023/90786 dharmaayoddha@gmail.com

* परभणी * वर्ष ४ रे * अंक ३३ *रविवार,दिनांक ३० ऑगस्ट २०२६ * पाने ४ * किंमत ३ रुपये

* PARBHANI *YEAR 4 * ISSUE 33 * SUNDAY 30 AUGAST 2026 * PAGES 4 * RS 3

## सिंहस्थ महाकुंभची सर्व कामे वेळेतच पूर्ण करणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस




**नाशिक-** सिंहस्थ कुंभमेळ्याचा कालावधी लक्षात घेता विविध कामे वेगात सुरू आहेत. सर्व संबंधित यंत्रणा ही कामे वेळेत पूर्ण करण्यासाठी पूर्ण क्षमतेने कार्यरत आहेत. भारतीय संस्कृतीचा सर्वात मोठा अविष्कार असलेल्या या महासोहळ्याची सर्व कामे निर्धारीत वेळेत पूर्ण करण्यात येतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणातर्फे ठक्कर डोम येथे आजपासून सुरू झालेल्या तीन दिवसीय सिंहस्थ महाकुंभ भक्ती संगम कार्यक्रमाच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीष महाजन, पणन मंत्री जयकुमार रावल, उद्योग मंत्री डॉ. उदय सामंत, शालेश शिक्षण मंत्री दादाजी भुसे, महापौर हिमगौरी आडके-आहेर, खासदार शोभा बच्छाव, राजाभाऊ वाजे उपस्थित होते.

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने उत्तम सुविधा निर्माण करण्यात येत असल्याचे नमूद करीत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, साधुग्रामची जागा अडीच हजार कोटी रुपये खर्च करून कायमस्वरूपी अधिग्रहीत करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. या जागेचा उपयोग भविष्यातही कुंभमेळ्यासाठीच व्हावा, यासाठी त्यांची योग्य पद्धतीने व्यवस्था करण्यात येणार आहे. कुंभमेळ्यासाठी रस्ते, पायाभूत सुविधा तसेच भाविकांसाठी आवश्यक विविध नागरी सुविधा विकसित करण्यात येत आहेत. साधुग्रामच्या जागांबाबत काही नागरिक व शेतकऱ्यांच्या तक्रारी असल्यास त्या संवेदनशीलतेने त्या दूर करण्यात येतील. शक्य त्या सुधारणा करण्यात येऊन संबंधितांना योग्य मोबदला मिळावा, यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. मुख्यमंत्री म्हणाले, कुंभमेळ्यासाठी खर्च होणाऱ्या निधीतून नाशिक, त्र्यंबकेश्वरसह जिल्ह्यात दीर्घकाळासाठी पायाभूत सोयीसुविधा निर्माण होणार आहेत. सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असल्याने नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरातील नागरिकांना काही प्रमाणात त्रास सहन करावा लागत आहे. याची जाणीव शासन-प्रशासनाला असून कामे पूर्ण झाल्यानंतर नागरिक निश्चितपणे या कामांचे स्वागत करतील. सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी वेळेच्या मर्यादेत पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांमध्ये समन्वय साधण्यात येत आहे. तसेच इतर सर्व संबंधित विभागांनी कामांना गती दिली आहे. कामांमध्ये येणाऱ्या अडचणी तातडीने दूर करून आवश्यक त्या सर्व उपाययोजना पूर्ण करण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. सर्वांच्या सहकार्याने सिंहस्थ कुंभमेळ्याची तयारी दर्जेदार, पारदर्शक पद्धतीने आणि नियोजित वेळेत पूर्ण करून हा कुंभमेळा सुरक्षित, सुव्यवस्थित आणि यशस्वी करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे, असेही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

## अण्णाभाऊंच्या जयंतीनिमित्त ताडकळस येथे जल्लोष

(वजीर पठाण/ दै.धर्मयोध्दा)



**ताडकळस-** साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०६व्या जयंतीनिमित्त शुक्रवार, दि. २८ ऑगस्ट रोजी ताडकळस येथे जयंती उत्साहात व शांततेत साजरी करण्यात आली. ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी मार्केट कमिटीचे सभापती बालाजी रुद्रवार, जिल्हा परिषद सदस्य संजय जल्हारे, भारतीय जनता पार्टीचे जिल्हा सरचिटणीस ऋषिकेश सकनुर, मार्केट कमिटी संचालक दिलीपराव आंबोरे पाटील, ग्रामपंचायत सदस्य मनू पाटील आंबोरे, सुरेश मगरे, मारुती अण्णा मोहिते, माजी सदस्य राजेंद्र मगरे, लक्ष्मण कौटेकवार उर्फ लखन सावकार, पत्रकार त्र्यंबक खंदारे, फिरोज पठाण, वजीर पठाण, यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यानंतर दुपारी ३ वाजता लहुजी नगर येथून पालम टी-पॉईंटपर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. ब्रास बँडसह निघालेल्या या मिरवणुकीत नागरिक, युवक, महिला मंडळ व समाजबांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले. मिरवणुकीदरम्यान लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या विचारांचा जयघोष करण्यात आला. मिरवणुकीदरम्यान ताडकळसचे भूमिपुत्र शहीद जवान बालाजी आंबोरे यांच्या स्मारकाला पुष्प अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. मिरवणूक पोलीस ठाण्यासमोर आल्यानंतर सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीधर जगताप यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यिक, सामाजिक व परिवर्तनवादी विचारांचे स्मरण करून त्यांच्या समतेच्या आणि सामाजिक बांधिलकीच्या विचारांचा जागर करण्यात आला. दुपारी ३ वाजता सुरू झालेली मिरवणूक सायंकाळी ७ वाजता शांततेत संपन्न झाली. मिरवणूक शांततेत पार पडावी यासाठी ताडकळस पोलिसांच्या वतीने चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नागरिकांनीही पोलिसांना सहकार्य केल्याने मिरवणूक शांततेत पार पडली. कार्यक्रमानंतर उपस्थितांसाठी खिचडी प्रसादाची व्यवस्था करण्यात आली.

## नांदेडमध्ये पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी बांधल्या वाहन चालकांना राख्या बहीण-भावाच्या नात्यापलीकडे जात रस्ता सुरक्षेचा नवा संदेश

(महेद्र पूरी/ दै.धर्मयोध्दा)





**हिंगोली-** भारतामध्ये श्रावण शुद्ध पौर्णिमा हा दिवस अत्यंत पवित्र आणि स्नेहाचा सण म्हणजेच रक्षाबंधन म्हणून मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. आजपर्यंत हा सण प्रामुख्याने बहीण आणि भावाच्या पवित्र प्रेमाचे, संरक्षणाचे प्रतीक मानला गेला आहे. मात्र, यंदा नांदेडमध्ये या सणाला एक अत्यंत अनोखा आणि संवेदनशील रस्ता सुरक्षेचा सामाजिक पैलू पाहायला मिळाला. नांदेड शहर वाहतूक पोलीस, परिवहन विभाग आणि सेफर इंडियन रोड्स यांच्या संयुक्त विद्यमाने रोड सेफ्टी राखी-२०२६ या अभिनव जनजागृती उपक्रमाचे आयोजन वजिराबाद चौक पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ करण्यात आले. वाहनधारकांना रस्ता सुरक्षेची राखी: या अनोख्या जनजागृती उपक्रमाचे उद्घाटन पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांच्या हस्ते करण्यात आले. पोलीस अधीक्षकांनी स्वतः रस्ता सुरक्षा अशा अभिनव पद्धतीने वाहनधारकांना राख्या बांधल्याचे पाहून तेथील नागरिक आणि विशेषतः महिलांना खूप मोठे आश्चर्य वाटत होते. महिलांसाठी हा एक अतिशय सुखद धक्का होता की पोलीस अधीक्षक स्वतः रस्त्यावर येऊन राख्या बांधत आहेत! मात्र, जेव्हा त्यांना या रोड सेफ्टी रक्षाबंधनाचा खरा अर्थ म्हणजेच अमूल्य मानवी जीवांचे रक्षण करणे हा रस्ता सुरक्षेचा उदात्त संदेश समजला, तेव्हा महिलांसह उपस्थितांनी आश्चर्याने तोंडात बोटे टाकली. प्रत्येक चालकाचा जीव त्यांच्या कुटुंबासाठी किती महत्त्वाचा आहे, हा संदेश या उपक्रमातून प्रत्येकाच्या मनाला थेट भिडला. सर्वांचे लक्ष वेधून घेणारा हा नाविन्यपूर्ण कार्यक्रम संपूर्ण शहरात प्रचंड आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.अमूल्य जीव वाचवणे हेच खरे कर्तव्य पोलीस अधीक्षकांचे आवाहन: याप्रसंगी बोलताना पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन यांनी वाहनचालक व नागरिकांना वाहतूक नियमांचे काटेकोरपणे पालन करण्याचे तसेच रस्त्यावरील इतर वापरकर्त्यांचा आदर करण्याचे आवाहन केले. जीवघेणे रस्ते अपघात कमी करण्यासाठी प्रत्येक नागरिकाचे योगदान महत्त्वाचे आहे, असे त्यांनी स्पष्ट केले.ते पुढे म्हणाले की, बहुतांश जीवघेणे अपघात हे मानवी चुका तसेच रस्ते सुरक्षेच्या नियमांकडे होणाऱ्या दुर्लक्षामुळे घडतात. त्यामुळे नागरिकांनी रस्ता सुरक्षेबाबतच्या सूचनांकडे गांभीर्याने लक्ष देऊन त्या आपल्या कुटुंबीय व प्रियजनांपर्यंत पोहोचवाव्यात.त्यांनी नागरिकांना आणि पालकांना पुढील महत्त्वाचे आवाहन केले.

## सहकार विभागतील सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांना उच्च न्यायालयाचा दिलासा




(मधुसूदन सोनवळकर / दै. धर्मयोध्दा)

**छत्रपती संभाजीनगर -** सेवा निवृत्तीच्या अंतिम वर्षात सहा महिने किंवा त्या पेक्षा जास्त काळ सेवा बजावलेल्या सहकार विभागातील अनिलकुमार दाबशेडे आणि याचिकाकर्ते सुमारे २७९ जणांनी उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात काल्पनिक वेतन वाढ मिळावी म्हणुन याचिका विधिज्ञ ॲड संदीप सोनटक्के यांचे वतिने याचिका दाखल केली होती या संदर्भात उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबादचे न्या . नितीन सुर्यवंशी व न्या . आबासाहेब शिंदे यांनी नुकताच २० ऑगस्ट २०२६ रोजी दिलासा देणारा निर्णय दिला आहे मा . न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार सेवानिवृत्त कर्मचारी यांच्या शेवटच्या वर्षाची वार्षीक वेतन वाढ समाविष्ट करून त्यांच्या पेन्शनची पुर्नरचना करावी सेवानिवृत्तीच्या आधिच्या अंतीम वर्षात कर्मचाऱ्याने किमान सहा महीने किंवा त्याहून आधिक काळसेवा केलेली असणे आवशक आहे. फेररचनेसह निवृत्ती वेतनावरील थकबाकीची रक्कम संबंधीत कर्मचाऱ्यांना पुढील ९० दिवसाच्या आत अदा करावी मात्र पुर्वीच्या आदेशानुसार थकबाकी रक्कमेवर व्याज मिळणार नाही असे मा .उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयात नमूद केले आहे सर्व याचिकाकर्ते यांची बाजू विधीज्ञ संदीप सोनटक्के यांनी मा . न्यायालयात मांडली तर राज्य सरकाच्या वतीने ॲड बी बी भीसे आणि ॲड एम .के . गोयंका यांनी बाजू मांडली.

## सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक गणेश वाघमारे यांच्या निधणानंतर त्यांच्या कुटूंबियाणी राबवला स्तुत्य उपक्रम



**परभणी-** मानवत तालुक्याती रामपुरी (बु.) येथील लिमरा कनिष्ठ महाविद्यालयात सेवानिवृत्त पोलीस उपनिरीक्षक गणेश निवृत्तीराव वाघमारे यांच्या स्मरणार्थ वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला. गणेश वाघमारे यांचे दि. १८ ऑगस्ट २०२६ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले होते. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

याप्रसंगी वाघमारे कुटुंबातील प्रकाशराव वाघमारे, भगवानराव वाघमारे, बहीण पद्मीणबाई कदम, मुलगी डॉ. मिनाक्षी पाटील व जावई श्री. विठ्ठल भुसारे (शिक्षणाधिकारी, वाशिम जिल्हा), डॉ. मंजुषा पाटील व जावई डॉ. पंकज हसे ,( प्राध्यापक, पशुवैद्यकीय महाविद्यालय परभणी) हे उपस्थित होते. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य एस.डी. पवार सर्व प्राध्यापक, गोपाळ यादव, गावकरी मंडळी आणि महाविद्यालयाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वृक्ष लागवड करून वाघमारे कुटुंबाने निसर्ग संवर्धनाचा संदेश देत समाजासमोर एक चांगला आदर्श ठेवला. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## छत्रपती संभाजीनगरला स्वतंत्र रेल्वे क्षेत्र निर्माण करण्यासाठी एकनाथ शिंदेंचा पुढाकार जलील पटेल यांच्या मागणीवरून शिंदेंचे रेल्वेमंत्र्यांना पत्र


(जावेद पटेल/ दै.धर्मयोध्दा)




**परभणी -** मराठवाड्यासह महाराष्ट्रातील रेल्वेच्या विकासासाठी तसेच रेल्वेच्या प्रशासनात मराठवाड्याची वेगळी छाप निर्माण करण्यासाठी छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे स्वतंत्र रेल्वे झोन स्थापन करण्यासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुढाकार घेतला असून, शिवसेना नेते जलील पटेल यांच्या आग्रही मागणीवरून शिंदे यांनी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र लिहून मराठवाड्यासाठी छत्रपती संभाजीनगर येथे स्वतंत्र रेल्वे झोन स्थापन करण्यास मंजुरी देण्याची मागणी केली. राज्यात महायुती सरकारमधील क्रमांक दोनवर असलेल्या शिवसेनेच्या पक्षप्रमुखाने ही मागणी पुढे रेटल्याने मराठवाड्यातील जनता तसेच रेल्वेच्या विकासासाठी झटणाऱ्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या मनात आशेचा एक किरण निर्माण झाला आहे.

माहे एप्रिलमध्ये परभणी येथील शिवसेना नेते जलील पटेल यांनी यासंदर्भात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत निवेदन सादर केले होते, ज्यात त्यांनी मराठवाडा हा महाराष्ट्रातील महत्त्वाचा भौगोलिक, औद्योगिक व पर्यटनदृष्ट्या विकसित होत असलेला प्रदेश आहे, असे नमूद केले होते. हे मराठवाड्याचे प्रमुख औद्योगिक, शैक्षणिक व पर्यटन केंद्र असून, येथे अजिंठा, वेरूळसारखी जागतिक दर्जाची पर्यटनस्थळे आहेत. तसेच शेंद्रा-बिडकीन औद्योगिक वसाहत, विविध उत्पादन उद्योग आणि वाढता व्यापारी व्यवहार यामुळे या परिसराचे धोरणात्मक महत्त्व वाढले आहे. सध्या मराठवाड्यातील रेल्वे प्रशासन वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आणि विभागांमध्ये विभागलेले असल्याने विकासकामांमध्ये समन्वयाचा अभाव दिसून येतो. नवीन रेल्वेमार्ग, दुहेरी मार्ग, विद्युतीकरण तसेच प्रवासी सुविधांशी संबंधित विकासकामांना अपेक्षित गती मिळत नसल्याची बाब नमूद करत रेल्वे प्रशासन अधिक कार्यक्षम होईल आणि मराठवाड्याच्या विकासाला मोठी चालना मिळण्यासाठी छत्रपती संभाजीनगरला केंद्रस्थानी ठेवून जालना, परभणी, नांदेड, हिंगोली, धाराशिव, बीड, लातूर या जिल्ह्यांसह नांदेड, सोलापूर, मनमाड आणि भुसावळ या रेल्वे विभागांचा समावेश करून स्वतंत्र रेल्वे क्षेत्र निर्माण करण्यासाठी केंद्र सरकारकडे आपले राजकीय वजन खर्ची घालण्याची मागणी केली होती. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी या मागणीची दखल घेत २७ ऑगस्ट रोजी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र लिहिले असून, यात जलील पटेल यांच्या मागणीतील प्रमुख मुद्द्यांचा संदर्भ देत छत्रपती संभाजीनगर येथे स्वतंत्र रेल्वे झोन स्थापन करण्याची मागणी केली आहे. यावर जलील पटेल यांनी समाधान व्यक्त करत उपमुख्यमंत्री शिंदे यांचे आभार मानले असून, आता सदरील पत्रानुसार खासदार डॉ. श्रीकांत शिंदे व मराठवाड्यातील खासदारांकडे सतत पाठपुरावा करून ही मागणी केंद्र सरकारकडे लावून धरण्याचा संकल्प व्यक्त केला आहे.

## राज्यातील अंगणवाड्या एफडीए च्या रडारवर- आयुक्त तुकाराम मुंडे



(मधुसूदन सोनवळकर/दै.धर्मयोध्दा)

**मुंबई-** राज्यातील अंगणवाड्या साठी पुरवीण्यात येणारा पोषण आहार अतिशय नित्कृष्ट दर्जा चा असल्याच्या तक्रारी अन्न आणि औषध प्रशासन विभागाला प्राप्त झाल्या असल्यामुळे राज्यातील सर्व अंगणवाडी केंद्राची महीन्यातून दोन वेळा अचानक तपासणी केली जाणार असल्याचे आदेश अन्न आणि औषधी प्रशासनचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी विभागाला दिले असल्याने पोषण आहार पुरवीणाऱ्या कंत्राटदार आणी संबंधित अंगणवाडी केंद्राचे धाबे दणाणले आहेत पोषण आहारा सोबतच किचन शेड मधील स्वच्छता या विषयाकडे ही विशेष लक्ष तपासणी करताना दिले जाणार आहे लहान बालकांना दिला जाणारा पोषण आहारच जर अत्यंत नित्कृष्ट दर्जाचा असेल त्यात किडे आळ्या मुंग्या लागलेल्या असतील तर ही बाब अतिशय गंभीर स्वरूपाची असून लहान बालकाचे आयुष्याशी खेळणे सारखा प्रकार असल्याने अशा पुरवठा कंत्राटदारावर कडक कार्यवाही केली जाईल जेणे करुन पुन्हा अशा लहान मुलांच्या आयुष्याशी खेळण्याचे धाडसच कुणी करता कामा नये अशा गंभीर प्रश्नावर वेळीच लक्ष पुरवीणे आवशक आहे खिचडी साठी वापरला जाणारा तांदूळ कीड लागलेले चणे हारभरे व सुटे तेल याची कसूण चौकशी करावी कोणाच्याही दडपणास बळी पडूनये अशा कडक सुचना संबंधीत अधिनस्थ अधिकारी कर्मचारी यांना राज्य अन्न औषधी विभागाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांनी दिल्या आहेत.

## वसमत येथील अहिल्यादेवी होळकर विद्यालयाच्या विद्यार्थीनींनी देशाचे रक्षण करणाऱ्या जवानांना पाठविल्या ११११ राख्या

(डॉ जांबूतकर/ दै.धर्मयोध्दा)



**वसमत-** वसमत शहरातील अहिल्यादेवी होळकर कन्या विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी सीमेवरील आपल्या देशाचे रक्षण करणार्या जवानांना पाठविल्या ११११ राख्या रक्षाबंधनाच्या सना निमीत्ताने विद्यालयात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते अहिल्यादेवी होळकर कन्या विद्यालयात विद्यार्थिनींनी व शिक्षिकानी पूढाकार घेऊन विविध ठिकाणी सीमेवर कार्यरत असलेल्या व आपले संरक्षण करीत असलेल्या भारतीय जवानांना ११११ राख्या पाठवून भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.लेह, लडाख ,मिझोरम,पंजाब,आसाम,जम्मू काश्मीर येथे कार्यरत असलेले बंधू जवान याना राख्या पाठवून अशा शुभेच्छा दिल्या की... राखी फक्त एक रेशमी धागा नाही, तर त्यात आमच्या हृदयातील कृतज्ञता, प्रेम आणि तुमच्या दीर्घ आयुष्यासाठी देवाकडे केलेली प्रार्थना विणलेली आहे. हा धागा तुम्हाला आठवण करून देईल की, तुम्ही एकटे नाहीत.सीमेवर जरी तुम्ही एकटे पहारा देत असाल, तर माझ्या भारत देशातील करोडो बहिणींचे आशीर्वाद आणि आपुलकी तुमच्या पाठीशी आहे.तुमचे रक्षण देव करो आणि तुम्ही नेहमी सुरक्षित राहोत हीच आमची ईश्वरचरणी प्रार्थनाआहे.त्याच प्रमाणे सदर जवान बंधूनीही विद्यार्थिनी भगिनींची भावनिक आशयाची कृतज्ञता संदेश देऊन व्यक्त केली व आनंद व्यक्त केला. नारळी पौर्णिमा,रक्षाबंधनाचे औचित्य साधून विद्यालयातील महिला शिक्षक भगिनींनी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी बांधवांना राख्या बांधून औक्षण केले व रक्षाबंधना निमित्य शुभेच्छा दिल्या. तसेच सर्व महिला शिक्षिका भगिनी व विद्यार्थिनींनी परिसरातील वडाचे झाड, पिंपळाचे झाड व इतर वृक्षांना राख्या बांधल्या व पर्यावरणाच्या संतुलनाचा संदेश परिसरातील सर्वांना दिला. या कार्यक्रमाचे नियोजन तथा आयोजन विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ. पतंगे सरिता शिवाजीराव, पर्यवेक्षिका श्रीमती शामल शिंदे, प्रभारी प्राचार्या सौ. कातोरे संध्या,श्रीमती चौधरी मुग्धा,सर्व महिला शिक्षक भगिनींनी केले.या कार्यक्रमाचे तथा विद्यार्थिनींचे कौतुक सर्वत्र होत आहे.